I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** अर्जुनी मोरगांव **Year (वर्ष):** 2024

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0402 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/11/2024 01:21 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 15/10/2024 **Date To (दिनांक पर्यंत):** 22/10/2024

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 13:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:33 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 11/11/2024 **Time (वेळ):** 23:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 12/11/2024 00:18 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 18 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखा,अर्जुनी/मोरगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** मुलचंद अर्जुन लोणारे

**(b) Father's Name (चे नाव ):** अर्जुन लोणारे

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1959 **(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):** सेवानिवृत्‍ त शासकिय कर्मचारी

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ईटखेडा, अर्जुनीमोरगाव, अर्जुनी मोरगांव, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | ईटखेडा, अर्जुनीमोरगाव, अर्जुनी मोरगांव, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8262860241

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | विलास गोपाळा नाकाडे | | वडील चे नाव : गोपाळा नाकाडे | 1. पोष्ट ऑफीसचे मागे,Town/Village (शहर / गाव): अर्जुनी/मोरगाव,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): अर्जुनी मोरगांव,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | अशोक पांडुरंग लंजे | | वडील चे नाव : पांडुरंग लंजे | 1. Town/Village (शहर / गाव): बोदरा,Tehsil (तहसील): अर्जुनीमोरगाव,Police Station (पोलीस ठाणे): अर्जुनी मोरगांव,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | ज्ञानेश्वर वामन नाकाडे | | वडील चे नाव : वामन नाकाडे | 1. Town/Village (शहर / गाव): कोरंभीटोला,Tehsil (तहसील): अर्जुनी/मोरगाव,Police Station (पोलीस ठाणे): अर्जुनी मोरगांव,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

पोस्टेला तक्रार प्राप्त होताच.

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ओडियो कॅसेट | दोन सनडिस्क कंपनीचे 32 GB क्षमतेचे मेमोरी कार्ड | .00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

ला.प्र.वि. गोंदिया
कॅम्प पोलीस स्टेशन अर्जुनीमोरगाव
दि. 11.11.2024

नांवः- श्री मुलचंद अर्जुन लोणारे, धंदा-सेवानिवृत्त परिचर, प्रषिक विद्यालय टोला मांडोखाल,ता. अर्जुनीमोरगाव, जि. गोंदिया, रा. ईटखेडा, ता. अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया मो. क्र. 8262860241.

मी आज रोजी पोलीस स्टेशन अर्जुनीमोरगाव येथे समक्ष हजर राहुन फिर्याद नोंदवितो की, मौजा ईटखेडा ता.अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया येथे आपले कुटूंबासह राहावयास आहे आणि दि.30.04.2019 रोजी परिचर या पदावरुन प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल, ता.अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया येथुन सेवानिवृत्त झालो आहे. सेवेत असतांना मला सातव्या वेतन आयोगाचे दोन लाभ मिळाले असुन तिन लाभ मिळणे बाकी होते. माझेसोबतच प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल येथे परिचर म्हणुन असलेले श्री डोंगरे हे मागील आठवडयात मला भेटण्यास आले होते तेव्हा त्यांनी त्यांना सातव्या वेतनआयोगाचे उर्वरीत तिन लाभ मिळाले असल्याचे सांगीतले होते. त्यामुळे मी देखील मला सातव्या वेतन आयोगाचे तिन लाभ मिळाले नसल्याने ते लाभ काढुन देण्याकरीता दिनांक 10.10.2024 रोजी प्रषिक विद्यालय टोला मांडोखाल येथे जावुन प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे यांना विनंती केली असता त्यांनी तसेच श्री अषोक लंजे शिक्षक व ज्ञानेष्वर नाकाडे खाजगी ईसम यांनी माझे सातव्या वेतन आयोगाचे तिन लाभ काढुन देण्याकरीता माझेकडे रु.15,000/- लाचेची मागणी केल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस दिनांक 14.10.2024 लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे जावुन पोलीस निरीक्षक श्री. राजीव कर्मलवार, ला.प्र.वि

गोंदिया यांचे समक्ष त्यांचे विरुध्द लाच मागणी संबधाने हस्तलिखीत तक्रार नोंदविली आहे. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

” दिनांक 14/10/2024

प्रति,

मा.पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया.

विषयः- सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत तीन लाभ मिळवुन देण्याकरीता 15,000/- रुपये लाच मागणारे शाळेचे मुख्याध्यापक विलास नाकाडे, शाळेचे शिक्षक अषोक लंजे व खाजगी इसम ज्ञानेश्वर नाकाडे यांचे वर कार्यवाही होण्याबाबद

अर्जदारः- मुलचंद अर्जुन लोणारे, वय 65 वर्ष, धंदा- सेवानिवृत्त (परिचर) रा.ईटखेडा, ता.अर्जुनी मोरगांव,
जि.गोंदिया मो.नं.8262860241

महोदय,

मी दि.01.07.1993 रोजी प्रषिक विद्‌यालय टोला माडोखाल, ता.अर्जुनी मोरगांव, जि.गोंदिया इथे परिचर म्हणुन नौकरीवर लागुन दि.30.4.2019 ला सेवानिवृत्त झालो. माझ्या सोबत प्रशिक विद्‌यालयात परिचय म्हणुन काम करणारे श्री.डोंगरे हे मागील 2 वर्षापुर्वी परिचर पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत. ते मागील आठवडयात माझ्या घरी मला भेटायला आले होते तेव्हा त्यांनी बोलता बोलता मला सांगीतले की, त्यांना सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत 3 लाभ मिळालेले आहे. तुम्हाला मिळालेत काय? असे विचारणा केली त्यावर मी त्यांना मला हप्ते मिळालेले नाही असे म्हटलो. तेव्हा माझे सुध्दा सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते मिळायचे असल्याने मी दि.10.10.2024 रोजी प्रशिक विद्‌यालय मांडोखाल इथे गेलो. त्याठिकाणी प्रभारी मुख्याध्यापक विलास गोपाळा नाकाडे यांना भेटनु मला सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत तीन हप्त्यांचा लाभ मिळवुन देण्याची विनंती केली. तेव्हा श्री.विलास नाकाडे सर यांनी माझे सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत तीन हप्ते काढुन देण्याकरीता पंधरा हजार रुपये लागतील असे मला सांगीतले.

त्यावेळेस मी त्यांना पैसे जास्त होतात काहीतरी कमी करा सर असे म्हटलो. तेव्हा मुख्याध्यापक श्री.विलास नाकाडे सर यांनी त्यापेक्षा कमी पैषामध्ये काम होणार नसल्याचे सांगुन काम करायचे असल्यास श्री.अषोक लंजे सर व ज्ञानेष्वर नाकाडे यांना भेटण्यास सांगीतले. त्यानुसार मी शिक्षक श्री.अशोक लंजे व मॅनेजमेंट चे काम पाहणारे श्री. ज्ञानेष्वर नाकाडे यांना भेटलो. त्या दोघांनी मला तुम्ही कसे काय आले? अशी विचारणा केली तेव्हा मी त्यांना माझे सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत तीन हप्ते मिळाले नसल्याने मुख्याध्यापक सरांना भेटायला आलो. त्यांनी मला ते काम करण्यासाठी पंधरा हजार रुपये लागतील असे सांगुन काम करायचे असल्यास तुम्हा दोघांना भेटण्यास सांगीतल्याने तुमच्या कडे आलो आहे. सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत तीन हप्त्याच्या

बिलाचे कसे करायचे असे म्टटले. तेव्हा शाळेचे मॅनेजमेंटचे काम पाहणारे श्री. ज्ञानेष्वर नाकाडे व शाळेतील बिल तयार करण्याचे काम पाहणारे शिक्षक श्री.अशोक लंजे यांनी मुख्याध्यापक श्री.नाकाडे सरांच्या सांगण्याप्रमाणे पंधरा हजार रुपये दयावे लागतील तेव्हाच तुमचे सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत तीन हप्ते काढुन देवु असे म्हटले. त्यावरुन मी त्यांना तीन-चार दिवसात पैषाची व्यवस्था करुन तुमच्याकडे येतो असे सांगुन घरी निघुन आलो.

तरी प्रभारी मुख्याध्यापक श्री.विलास नाकाडे, शाळेचे शिक्षक श्री.अशोक लंजे व शाळेचे मॅनेजमेंट चे काम पाहणारा श्री.ज्ञानेष्वर नाकाडे यांनी माझ्या सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत तीन हप्ते काढुन देण्याकरीता पंधरा हजार रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांना ती लाच देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने त्यांच्यावर कायदेषीर कारवाई होण्यास लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया येथे तक्रार देत आहे. माझे श्री.विलास नाकाडे, श्री.अशोक लंजे व श्री.ज्ञानेष्वर नाकाडे यांच्यासोबत कुठलेही आर्थीक व्यवहार व जुने वैमनस्य नाही.
करीता त्यांचेवर कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.“

तरी, गै.अ. क्र. 1. विलास गोपाळा नाकाडे वय-56 वर्ष व्यवसाय- नौकरी पद- प्रभारी मुख्याध्यापक, प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. पोष्ट ऑफीसचे मागे अर्जुनीमोरगाव ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया, गै.अ. 2 अशोक पांडुरंग लंजे वय-54 वर्ष व्यवसाय नौकरी, सहायक शिक्षक प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. बोदरा ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया व गै.अ. खाजगी इसम ज्ञानेष्वर वामन नाकाडे वय-36 वर्ष व्यवसाय- शेती, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रा. कोरंभीटोला ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया यांनी माझेकडे माझे सातव्या वेतन आयोगाचा थकबाकीचे उर्वरीत 3 हप्ते काढुन देण्याकरीता रु.15,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक यांनी ती लाच रक्कम गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे देण्यास सांगुन लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने तसेच गै.अ. श्री अषोक लंजे यांनी लाच मागण्यास प्रोत्साहन दिल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस माझी फिर्याद आहे.

त्यानंतर पो.नि.श्री राजीव कर्मलवार यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन पंच श्री. नंदकिशोर नत्थुजी झाडे, वय 46 वर्ष, पद- कनिष्ठ लिपीक, कार्यालयाचा पत्ता- कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, सिव्हील लाईन गोंदिया, कायमचा पत्ता- श्रीनगर वार्ड, दुर्गा मंदीर जवळ, आयलानी किराणा दुकाणाच्या बाजुला गोंदिया, ता.जि. गोंदिया. मो.क्र. 9373717205 व श्री. विचीत्र यषवंत भातनकर, वय 50 वर्ष, पद- सहायक भांडारपाल, कार्यालयाचा पत्ता- कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, सिव्हील लाईन गोंदिया, कायमचा पत्ता- तिलक वार्ड, तिरोडा, ता. तिरोडा, जि. गोंदिया. मो. क्र. 8698134645 यांची आमच्याशी तसेच सापळा पथकाशी ओळख करुन देवुन त्यांना माझे तक्रारीबाबतची थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार वाचावयास दिली. त्यानंतर श्री. नंदकिशोर नत्थुजी झाडे यांना पंच क्र. 1 तर श्री विचीत्र यषवंत भातनकर यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमल्यानंतर त्यांचे सुचनेवरुन माझे तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व नंतर पो.नि. श्री. राजीव कर्मलवार यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पो.नि. राजीव कर्मलवार यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी

लाच रक्कम रु. 15,000/-त्यांच्याकडे जमा केली. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या ऑथ्रासीन पावडरची वैषिष्ट सांगुन त्या नोटांना ऑथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांच्या हस्ते पंचासमक्ष करुन दाखविले. त्यानंतर रू. 200/- दराच्या 75 चलनी नोटांना ऑथ्रासीन पावडर लावुन ऑथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा एका लिफाफ्यात टाकुन लिफाफा पंचासमक्ष कागदी लेबलने सिलबंद करुन त्यावर पंचाची स्वाक्षरी घेवुन व स्वतः स्वाक्षरी करुन तो सिलबंद लिफाफा ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला. त्यानंतर व्हाईस रेकार्डर कषा प्रकारे काम करतो याबाबत मला व पंचाना सविस्तर माहीती देवुन त्यामध्ये आवाज कषा प्रकारे रेकार्डर केला जातो याबाबतचे त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचे हस्ते प्रात्याक्षिक करुन दाखवुन व्हॉईस रेकार्डर सुस्थितीत करुन सुरक्षित ट्रॅपसुटकेस मध्ये ठेवुन दिला.

त्यानंतर पो.नि. श्री. राजीव कर्मलवार यांनी गै.अ. प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे, श्री अशोक लंजे षिक्षक व ज्ञानेश्वर नाकाडे (शाळेचे मॅनेजमेन्टचे काम पाहणारा खाजगी इसम), प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल ता., अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया यांच्याविरुध्दची लाच मागणीची पडताळणी कार्यवाही त्याच दिवषी प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल येथे जावुन करण्याबाबत मला बोलले असता मी त्यांना त्या दिवषी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमीत्त माझे गावी सार्वजनिक कार्यक्रम असल्याने तसेच त्यानिमीत्त शाळेला दुपारनंतर सुट्टी देण्यात आली असल्याने गै.अ. हे मिळुन येण्याची शक्यता फार कमी आहे त्यामुळे लाच मागणी पडताळणी कार्यवाही उद्या दिनांक 15.10.2024 रोजी करण्यात यावी अषी विनंती केली. त्यावर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दिनांक 15.10.2024 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरवुन मला कोरंभीटोला शिवार येथे दिनांक 15.10.2024 रोजीचे 11.00 वा. हजर राहण्यास सांगुन माझे दुचाकी वाहनाने स्वगावी जाण्यास रवाना केले. त्याबाबतच्या सविस्तर नोंदी पो.नि.कर्मलवार यांनी पंचनामा क्र.1 मध्ये घेतलेल्या आहेत.

पो.नि. श्री. राजीव कर्मलवार यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे मी दिनांक 15.10.2024 वेळ 11.00 वा. कोरंभीटोला शिवार येथे रोडचे बाजुला आपले दुचाकी वाहनासह हजर होतो. थोडयावेळानंतर त्या ठिकाणी पो.नि. श्री. राजीव कर्मलवार हे दोन्ही पंच व सापळा पथकासह हजर आल्यावर आपआपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अषाप्रकारे आडोशाला ठेवुन त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही करण्याचे ठरविले. तरी, गै.अ. क्र. 1. विलास गोपाळा नाकाडे वय-56 वर्ष व्यवसाय- नौकरी पद- प्रभारी मुख्याध्यापक, प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. पोष्ट ऑफीसचे मागे अर्जुनीमोरगाव ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया, गै.अ. 2 अशोक पांडुरंग लंजे वय-54 वर्ष व्यवसाय नौकरी, सहायक शिक्षक प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. बोदरा ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया व गै.अ. खाजगी इसम ज्ञानेष्वर वामन नाकाडे वय-36 वर्ष व्यवसाय-शेती, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रा. कोरंभीटोला ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया यांनी माझेकडे माझे सातव्या वेतन आयोगाचा थकबाकीचे उर्वरीत 3 हप्ते काढुन देण्याकरीता रु.15,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक यांनी ती लाच रक्कम गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे देण्यास सांगुन लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने तसेच गै.अ. श्री अषोक लंजे यांनी लाच मागण्यास प्रोत्साहन दिल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई

होणेस माझी फिर्याद आहे. त्यानंतर पो.नि. श्री. राजीव कर्मलवार यांनी व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना पुन्हा एकदा समजावुन सांगुन लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी घ्यावयाचे दक्षतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पो.नि.राजीव कर्मलवार यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेतली व त्याबाबतची यादी तयार करण्यात येवुन अंगझडतीत मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केल्या. त्यानंतर पो.नि.राजीव कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी ट्रॅप सुटकेसमधुन सुस्थितीत करुन ठेवुन असलेला व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढला, ज्यामध्ये सॅनडिस्क कंपनीचा 32 जी.बी. क्षमतेचा सिरीयल क्र. 3443DVATX15W चा मेमरी कार्ड टाकुन असलेला वेळ 13.15 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह माझे मो.सा ने गै.अ. प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे, श्री अशोक लंजे शिक्षक, श्री ज्ञानेष्वर नाकाडे (शाळेचे मॅनेजमेन्टचे काम पाहणारा खाजगी ईसम), प्रशिक विद्‍यालय, टोला मांडोखाल, ता. अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया यांचेशी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता गै.अ. हजर असलेले प्रशिक विद्‍यालय मांडोखाल येथे जाणेकरीता पाठविले.

मी, पंच क्र. 1 यांचेसह प्रशिक विद्‍यालय मांडोखाल येथे जावुन मुख्याध्यापक कक्षात गेलो असता तिथे प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे व ज्ञानेश्वर नाकाडे हे हजर होते. गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक विलास नाकाडे यांना मी माझे सातव्या वेतन आयोगाचे बिल बनविले काय म्हणुन विचारुन थोडेसे कमी करा म्हणुन विनंती केली असता त्यांनी मला माझा काही नाही असे म्हणुन त्यांचे बाजुला बसुन असलेले गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे हात दाखवुन बिल बनवनारे हे आहेत, मी फक्त सहया मारतो, मागला तेवढे लागतेत बाकी काही नाही अन येण्याजाण्याचा खर्च लागते असे म्हणुन मगाशी तुले सांगलो असे म्हटले. त्यावर मी त्यांना तेवढे जमत नाही असे म्हणुन लंजे सर नाही आहेत का असे विचारुन गै.अ. ज्ञानेश्वर लंजे यांना का म्हणते ज्ञानेश्वर असे म्हटल्यावर त्यांनी मला बिल काढुन देतो त्यासाठी खर्च लागते असे म्हणुन शाळेतील डोंगरेचे बिल कसे काढुन दिले याबाबत सांगीतले. त्यादरम्यान मुख्याध्यापक कक्षामध्ये गै.अ.श्री अशोक लंजे शिक्षक आले. त्यानंतर पुन्हा बिलासंबंधाने चर्चा होवुन गै.अ.मुख्याध्यापक नाकाडे यांना किती म्हणता असे म्हटल्यावर त्यांनी त्या दिवसी मी बोललो, डोंगरेन येवढे दिले म्हणुन तुले सांगलो तरी असे म्हटले त्यावर मी त्यांना डोंगरे नी किती दिलेत म्हणुन विचारलेवर गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांनी डोंगरे नी पंधरा दिले असे सांगीतले. त्यावर मी त्यांना पंधरा दयावेच लागतील म्हणुन विचारलेवर गै.अ.मुख्याध्यापक नाकाडे यांनी मी सहया मारेल, ते बाबु पाहतील असे म्हटल्याने गै.अ.अशोक लंजे शिक्षक यांना किती पैसे दयावे लागतील म्हणुन विचालेवर त्यांनी यांनी बोललेच असतील असे म्हटल्यावर मी त्यांना पंधरा दयावेच लागतील असे विचारलेवर गै.अ.अशोक लंजे यांनी तेवढे त लागतीलच कारण डॉक्युमेन्टचे आहेत असे म्हटले. त्यानंतर मी गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक नाकाडे यांना पंधरा दयावेच लागतील म्हणुन विचारलेवर त्यांनी तो ज्ञानेश्वर म्हणते तसे करुन घ्या, सरळ ज्ञानेश्वर च्या घरी नेवुन द्‍या, मला बाहेर जायचे आहे, आज आणुन देवाचे उद्‍या आणुन दे, सकाळी

ज्ञानेश्वर च्या घरी आणुन देजो असे म्हटल्याने मी त्यांना ठिक आहे येतो न देतो सर" असे बोलुन तिथुन निघुन सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर पो.नि.राजीव कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे गळयात लटकवुन असलेला व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 14.12 वाजता बंद केले.

त्यानंतर पो.नि.राजीव कर्मलवार यांनी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण गै.अ. प्रभारी मुख्याध्यापक गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक विलास नाकाडे, ज्ञानेष्वर नाकाडे खाजगी ईसम, अशोक लंजे शिक्षक यांनी माझेकडे माझे सातव्या वेतन आयोगाचे थकबाकीचे उर्वरीत 3 हप्ते काढुन देण्याकरीता रु.15,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक यांनी ती लाच रक्कम गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे देण्यास सांगुन लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची खात्री करुन गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही त्याच दिवशी प्रषिक विद्यालय टोला मांडोखाल येथे करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर पो.नि. राजीव कर्मलवार यांच्या सांगण्यावरून पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेतली व त्याबाबतची यादी तयार करण्यात येवुन अंगझडतीत मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केल्या. त्यानंतर पो.नि.राजीव कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी ट्रॅप सुटकेसमध्ये ठेवुन असलेला लाच रक्कमेचा सिलबंद लिफाफा बाहेर काढुन लिफाफा पंचासमक्ष फोडुन त्यामधील ऑथ्रासीन पावडर लावलेल्या रू.15,000/-चलनी नोटा पंचासमक्ष माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या बाजुच्या रिकाम्या खिष्यात ठेवल्या. त्यानंतर पो.नि. राजीव कर्मलवार यांनी मला व पंचांना सापळा कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधुन लाच मागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये वापरण्यात आलेला मेमरी कार्ड बाहेर काढुन त्याचे पॅकींगमध्ये सुरक्षित ठेवुन दिला. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडिस्क कंपनीचा, 32 जी.बी. क्षमतेचा, सिरीयल क्र. 3443DVATX13W असलेला एक नविन मेमरी कार्ड टाकुन वेळ 15.50 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1 व माझ्या आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर मला, पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या खाजगी मोटार सायकलने गै.अ. प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे, श्री ज्ञानेष्वर नाकाडे, श्री अशोक लंजे शिक्षक यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्याकरीता प्रषिक विद्यालय टोला मांडोखाल येथे जाण्यास रवाना केले व आमचे पाठोपाठ पो.नि. श्री कर्मलवार हे पंच क्र. 2 व सापळा पथकातील सदस्यांसह प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल येथे पोहचुन आजुबाजुला दबा धरून बसले.

मी, पंच क्र. 1 यांचेसह प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल येथील मुख्याध्यापक कक्षात गेलो असता तिथे गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे हे हजर मिळाले. त्यांनी मला पाहुन गै.अ. ज्ञानेश्वर नाकाडे बाहेर गेला आहे मगा पासुन फोन लावुन राहीलो असे म्हटल्याने त्यांना मी तुम्ही घेवुन घ्या ज्ञानेश्वर जवळ देवुन दयाल असे म्हटले तेव्हा त्यांनी मी फक्त तुझे कागदपत्र घेईन, हे ज्ञानेश्वर देजो लंजे सर बाहेर आहेत असे म्हटल्याने सापळा पथकास कोणताही

ईषारा न करता तिथुन निघुन ठरलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पो.नि.राजीव कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे गळयात लटकवुन असलेला व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 16.49 वाजता बंद केले.

त्यानंतर पो.नि.कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे फुलपॅन्टचे खिशात ठेवुन असलेली लाच रक्कम बाहेर काढुन लिफाफ्यात ठेवुन त्यावर दोन्ही पंचाची व त्यांची स्वाक्षरी घेवुन लिफाफा सिलबंद करुन ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला आहे.

त्यानंतर पो.नि.राजीव कर्मलवार यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण गै.अ. मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे यांनी मला लाच रक्कम गै.अ. श्री ज्ञानेश्वर नाकाडे खाजगी ईसम यांचेकडे देण्यास सांगुन तो बाहेर गेला आहे, गै.अ.लंजे शिक्षक बाहेर आहेत असे सांगुन लाच रक्कम स्वतः घेण्यास टाळत असल्याचे दिसुन येत असल्याने गै.अ.मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे यांनी मला सांगीतल्याप्रमाणे गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे खाजगी ईसम हे आपले घरी परत आलेवर त्यांचेकडे त्यांचे घरी लाच रक्कम देण्याकरीता पाठवुन सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरवुन तिथेच थांबुन राहीलो. काही वेळानंतर गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे खाजगी ईसम हे आपले घरी परत आले अगर कसे? याबाबत मला माझे स्तरावर गोपनिय माहिती घेण्यास सांगीतले असता मी गोपनिय माहिती घेवुन सदर गै.अ.हे घरी परत आले नसल्याचे सांगीतल्याने व सदरचे ठिकाण हे नक्षलप्रभावित कोरंभीटोला शिवारातील असल्याने तिथे अधिकवेळ थांबुन राहणे धोक्याचे असल्याने मला दिनांक 16.10.2024 रोजी सदर गै.अ. यांचेकडे लाच रक्कम देण्याकरीता पाठवुन सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरवुन मला माझे स्वगावी जाण्यास रवाना केले. त्याबाबतच्या सविस्तर नोंदी पो.नि.कर्मलवार यांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतलेल्या आहेत. पो.नि.कर्मलवार यांनी दिनाकं 15.10.2024 रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी ठरलेल्या ठिकाणी हजर आलो काही वेळाने पो.नि.कर्मलवार हे आपले सापळा पथक व दोन्ही पंचासह हजर आलेत त्यांनी सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सर्वाना सुचना दिल्या.

त्यानंतर पो.नि. कर्मलवार यांनी मला गै.अ. श्री ज्ञानेश्वर नाकाडे खाजगी ईसम हे प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल येथे हजर आहेत अगर कसे याबाबत त्यांचे स्तरावर गोपनिय माहिती काढण्यास सांगीतले असता गै.अ.हे कोर्ट कामाने भंडारा येथे गेले असुन संध्याकाळी परत येणार आहेत असे पो.नि.कर्मलवार यांना सांगीतले. त्यावरुन पो.नि. कर्मलवार यांनी मला माझे मोबाईलचे स्पिकर सुरु करुन गै.अ. ज्ञानेश्वर नाकाडे यांना फोन करुन कोठे आहेत याबाबत बोलणी करण्यास सांगीतले असता गै.अ. यांनी मी नागपूर येथे कामानिमीत्त गेलो आहो, आल्यावर उदया परवा फोन करतो असे सांगीतले. तरी सुध्दा गै.अ. हे कदाचीत संध्याकाळ पर्यंत आपले गावी परत आल्यावर माझेशी संपर्क करुन बोलावु शकतात म्हणुन त्यांचे येण्याची वाट पाहत तिथेच सापळा पथकासह थांबुन राहीलो. संध्याकाळ होवुन अंधार पडत असल्याने पुन्हा एकदा पो.नि.कर्मलवार यांनी मला गै.अ. श्री ज्ञानेश्वर नाकाडे खाजगी ईसम हे गावी परत आले आहेत अगर कसे याबाबत माहिती घेण्यास सांगीतले असता माहिती घेवुन गै.अ.हे गावी परत आले नसल्याचे सांगीतले. यावरुन गै.अ. ज्ञानेश्वर नाकाडे यांचे सांगणेप्रमाणे ते नागपूर येथुन परत आल्यावर दोन तिन दिवसाने फोन करतो

असे म्हटल्याने मला तिन्ही गै.अ. पैकी जो कोणी लाच मागणी संबधाने संपर्क करेल तेव्हा आम्हास त्वरीत कळवुन आमचे सुचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करावी तसेच सदर कार्यवाहीबाबत कुठेही वाच्यता करणार नाही व गोपनीयता भंग करणार नाही असे सांगुन मला माझे स्वगावी जाण्यास रवाना करण्यात आले. त्याबाबतच्या सविस्तर नोंदी पो.नि.कर्मलवार यांनी पंचनामा क्र. 3 मध्ये घेतलेल्या आहेत.

दिनांक 22.10.2024 रोजी पो.नि. कर्मलवार यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9021452760 वरुन माझे मोबाईल क्र. 8262860241 वर फोन संपर्क करुन दिनांक 17.10.2024 ते 21.10.2024 या कालावधीत गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचा तुम्हाला फोन आला अगर कसे? तसेच गै.अ. हे नागपुर वरुन आपले गावी परत आले अगर कसे? याबाबत विचारणा केली त्यावर मी पो.नि.कर्मलवार यांना गै.अ. आपले गावी परत आले असुन त्यांचेकडे आपले बिलाचे कामा करीता गेल्यावर त्यांनी यापुर्वी सांगीतल्याप्रमाणे ते माझेकडे लाच रक्कमेची मागणी करुन स्विकारतील असे सांगीतल्याने पो.नि.कर्मलवार यांनी मला वेळ 12.30 वा.पर्यंत कोरंभीटोला षिवार येथे येवुन हजर राहण्याची सुचना देवुन सापळा कार्यवाहीकरीता पंच व सापळा पथकासह 12.30 वा. पर्यंत कोरंभीटोला शिवार येथे येत असल्याचे सांगीतले. पो.नि.कर्मलवार यांचे सुचनेप्रमाणे मी कोरंभीटोला शिवार येथे हजर आलो काही वेळाने पो.नि.कर्मलवार हे सापळा पथक व दोन्ही पंचासह त्या ठिकाणी हजर आले त्यांनी सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सुचना सर्वांना समजावुन सांगीतल्या.

त्यानंतर पो.नि. राजीव कर्मलवार यांच्या सांगण्यावरून पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेतली व त्याबाबतची यादी तयार करण्यात येवुन अंगझडतीत मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केल्या. गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक विलास नाकाडे, ज्ञानेश्वर नाकाडे खाजगी ईसम, अषोक लंजे शिक्षक यांनी माझेकडे माझे सातव्या वेतन आयोगाचा थकबाकीचे उर्वरीत 3 हप्ते काढुन देण्याकरीता रु.15,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक यांनी ती लाच रक्कम गै.अ. ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे देण्यास सांगुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याने पोनि कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी ट्रॅप सुटकेस मधुन लाच रकमेचा सिलबंद लिफाफा बाहेर काढुन त्यांतील रु. 15000/- माझे फुलपँटच्या उजव्या खिष्यामध्ये ठेवुन दिल्या. त्यानंतर पो.नि.कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी दिनांक 15.10.2024 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेला सॅनडिस्क कंपनीचा, 32 जी.बी. क्षमतेचा, सिरीयल क्र. 3443DVATX13W चा ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन असलेला असलेला मेमरी कार्ड बाहेर काढुन सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन वेळ 13.27 वाजता व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये माझे व पंच क्र. 1 यांच्या आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत केले व ते व्हॉईस रेकॉर्डर एका कापडी पिशवित ठेवुन ती पिशवी दोरीचे सहाय्याने माझे गळयामध्ये शर्टचे आत लटकवुन दिली.

त्यानंतर मला, पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या खाजगी मोटार सायकलने गै.अ. प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे, श्री ज्ञानेश्वर नाकाडे, श्री अषोक लंजे शिक्षक यांनी मागणी केलेली

लाच रक्कम त्यांना देण्याकरीता प्रषिक विद्यालय टोला मांडोखाल येथे जाण्यास रवाना केले व आमचे पाठोपाठ पो.नि. श्री कर्मलवार हे पंच क्र. 2 व सापळा पथकातील सदस्यांसह प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल येथे पोहचुन आजुबाजुला दबा धरून बसले.

"मी, पंच क्र. 1 यांचेसह गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे खाजगी ईसम यांना लाच रक्कम देण्याकरीता प्रशिक विद्यालय टोला मांडोखाल येथील मुख्याध्यापक कक्षात गेलो असता तिथे गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक विलास नाकाडे हे हजर होते, त्यांनी मला पाहुन का हो म्हणुन विचालेवर त्यावर मी त्यांना ज्ञानेश्वर कुठ आहे म्हणुन विचारलेवर गै.अ.मुख्याध्यापक यांनी तो शाळेत नाही, तु तिकडे घरी जा असे सांगीतले. त्यावरुन मी पंच क्र. 1 यांचेसह तिथुन निघुन गै.अ.ज्ञानेष्वर याचे घरी कोरंभीटोला येथे गेल्यावर गै.अ.ज्ञानेश्वर घरी हजर मिळाला. मी ज्ञानेष्वर यांना भाउ माझा काम कर दिवाळी येत आहे असे म्हटल्यावर गै.अ. यांनी मला माझे कामाविषयी बोलुन पैसे आणलास का म्हणुन विचारले असता मी हव म्हटल्यावर गै.अ.यांनी पैसे घ्यायले भिती लागते असे बोलुन त्या दिवषी कोणासोबत आला होतास म्हणुन सांग म्हटल्यावर मी जावयाच्या मेहुण्यासोबत आलो होतो म्हणुन सांगीतले. त्यावर गै.अ.यांनी हो का असे म्हणुन कोणाला तरी धरुन आला होता अशी त्याईन वार्ता लावली होती असे सांगुन मी आता शाळेत जातो, बोलतो ते का म्हणतेत त, पैसे आपल्याकडेच ठेव, माझेकडे तुझा नंबर आहे, पैसे काही देवु नको आपल्याकडे राहु दे, मग त्यायले विचारलेवर तुले फोन लावतो, आता तुमच्या मनात पाप आहे का त्यायच्या मनात पाप आहे, कोणाले का सांगु असे म्हणुन शाळेतील कामकाजाच्या गोष्टी सांगीतल्या. त्यानंतर मी गै.अ.यांना मग शाळेत गेल्यावर फोन करषील का म्हणुन विचारलेवर गै.अ.यांनी शाळेतुन गेल्यावर संध्याकाळी मीच फोन लावतो असे सांगीतल्याने मी गै.अ. यांना मग सायंकाळी पैसे आणुन दयावा लागल म्हणुन विचारलेवर गै.अ.यांनी तु आणुन नको देवुस, काही गरज नाही आणुन देवाची, तुल काम करणे आहे, माल काम करुन देणे आहे, फक्त त्यायचा मन थोडासा आसलतानी दिस नाही, तो पर्यंत मी नाही करु शकत, फक्त तु एक काम कर फालतु कोणाला फोन गीन लावु नको, आता काही पैसे देवु नकोस, मी जेव्हा फोन लावीन तेव्हा तुरंत काहीना काही करुन आणुन देवा लागल, ठिक आहे करुन देतो असे म्हटल्याने मी सापळा पथकास कोणताही ईषारा न करता पंच क्र. 1 यांचेसह तिथुन निघुन परत आलो. माझे मागोमाग सापळा पथक ठरलेल्या ठिकाणी परत आले.

त्यानंतर पो.नि.कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे फुलपॅन्टचे खिषात ठेवलेली लाच रक्कम बाहेर काढुन लिफाफ्यात ठेवुन त्यावर दोन्ही पंचानी व पो.नि.कर्मलवार यांनी स्वाक्षरी करुन लिफाफा सिलबंद करुन ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला आहे. त्यानंतर पो.नि.कर्मलवार यांनी सापळा कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हॉस रेकार्डमध्ये माझे व गै.अ. ज्ञानेश्वर नाकाडे यांच्यातील रेकार्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत व त्यास मी दिलेल्या दुजोऱ्यावरुन तसेच माझे व गै.अ यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांनी माझे बिलासंबंधाने गै.अ. मुख्याध्यापक श्री विलास नाकाडे, गै.अ.लंजे षिक्षक यांचेषी बोलतो त्यानंतर जेव्हा फोन लावीन तेव्हा तुरंत काहीना काही करुन आणुन देशील असे म्हणत असल्याने गै.अ. ज्ञानेश्वर नाकाडे हे माझेकडुन नजीकच्या काळात लाच रक्कम स्विकारण्यास तयार असल्याचे दिसुन येत आहे त्यामुळे गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचा मला फोन आल्यावर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात

आले. पो.नि. कर्मलवार यांनी गै.अ.यांचा फोन आल्यावर त्याबाबत त्वरीत आम्हास कळवुन आमचे सुचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याची तसेच सदर कार्यवाहीबाबत कुठेही वाच्यता करणार नाही व गोपनीयता भंग करणार नाही असे सांगुन मला माझे स्वगावी जाण्यास रवाना केले. त्याबाबतच्या सविस्तर नोंदी पो.नि.कर्मलवार यांनी पंचनामा क्र. 7 मध्ये घेतलेल्या आहेत.

त्यांनतर दिनांक 11.11.2024 रोजी दुपारी 14.00 वा दरम्यान मी माझे मोबाईल क्रमांक 8262860241 वरुन पो.नि.कर्मलवार यांचे मोबाईल क्रमांक 9021452760 वर फोन करुन सांगीतले की, गै.अ. ज्ञानेश्वर नाकाडे हे मला दिनांक 22.10.2024 ते कालपावेतो दोन तिनदा रस्त्यात व बाजारात भेटले मी त्यांचेशी बोलण्याचा प्रयत्न केलो परंतु त्यांनी माझ्याकडे दुर्लक्षकरुन बोलण्याचे टाळले तसेच त्यांनी खुप दिवस होवुन सुध्दा मला त्यांनी पैषासंबधाने फोन केला नाही. कदाचित त्यांना माझेवर अन्टी करप्शन संबधाने संशय आला असुन ते मला टाळत आहेत आणि आता यापुढे सुध्दा माझेकडे लाच रक्कमेबाबत बोलुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत, तरी आपण  तरी, गै.अ. क्र. 1. विलास गोपाळा नाकाडे वय-56 वर्ष व्यवसाय- नौकरी पद- प्रभारी मुख्याध्यापक, प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. पोष्ट ऑफीसचे मागे अर्जुनीमोरगाव ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया, गै.अ. 2 अशोक पांडुरंग लंजे वय-54 वर्ष व्यवसाय नौकरी, सहायक शिक्षक प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. बोदरा ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया व गै.अ. खाजगी इसम ज्ञानेष्वर वामन नाकाडे वय-36 वर्ष व्यवसाय- शेती, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रा. कोरंभीटोला ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया यांनी माझेकडे माझे सातव्या वेतन आयोगाचा थकबाकीचे उर्वरीत 3 हप्ते काढुन देण्याकरीता रु.15,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक यांनी ती लाच रक्कम गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे देण्यास सांगुन लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने तसेच गै.अ. श्री अषोक लंजे यांनी लाच मागण्यास प्रोत्साहन दिल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस माझी फिर्याद आहे.त्यांचेविरुध्द पुढील कार्यवाही आजच करावी अशी विनंती केली. त्यावरुन त्यांनी मला कोरंबीटोला शिवारा जवळ वेळ 16.30 वा.पर्यंत पोहचुन तिथे हजर राहण्यास सांगीतले.

त्याप्रमाणे मी कोरंबीटोला शिवारा जवळ आपली मोटरसायकल घेवुन हजर असतांना त्यादरम्यान पोलीस निरीक्षक श्री कर्मलवार हे दोन्ही पंच व सापळा पथकासह तिथे हजर आले. त्यानंतर मला तिन्ही गै.अ. हे कोठे राहतात याबबत विचारपुस करुन मला माझे स्वगावी जाणेस रवाना केले व तुम्हाला फोन केल्यानंतर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी असे सांगीतल्याने मी आपले स्वगावी जाण्यास रवाना झालो. काही वेळाने पोलीस निरीक्षक श्री कर्मलवार यांनी मला फोन करुन तिन्ही गै.अ.यांना ताब्यात घेवुन कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगुन पोलीस स्टेषन अर्जुनीमोरगाव येथे येण्यास सांगीतले. याबाबत तरी, गै.अ. क्र. 1. विलास गोपाळा नाकाडे वय-56 वर्ष व्यवसाय- नौकरी पद- प्रभारी मुख्याध्यापक, प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. पोष्ट ऑफीसचे मागे अर्जुनीमोरगाव ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया, गै.अ. 2 अशोक पांडुरंग लंजे वय-54 वर्ष व्यवसाय नौकरी, सहायक शिक्षक प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. बोदरा ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया व गै.अ. खाजगी इसम ज्ञानेष्वर वामन नाकाडे वय-36 वर्ष व्यवसाय-

शेती, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रा. कोरंभीटोला ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया यांनी माझेकडे माझे सातव्या वेतन आयोगाचा थकबाकीचे उर्वरीत 3 हप्ते काढुन देण्याकरीता रु.15,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक यांनी ती लाच रक्कम गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे देण्यास सांगुन लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने तसेच गै.अ. श्री अषोक लंजे यांनी लाच मागण्यास प्रोत्साहन दिल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस माझी फिर्याद आहे.च्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 10 मध्ये घेतलेल्या आहेत.

तरी, गै.अ. क्र. 1. विलास गोपाळा नाकाडे वय-56 वर्ष व्यवसाय- नौकरी पद- प्रभारी मुख्याध्यापक, प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. पोष्ट ऑफीसचे मागे अर्जुनीमोरगाव ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया, गै.अ. 2 अशोक पांडुरंग लंजे वय-54 वर्ष व्यवसाय नौकरी, सहायक शिक्षक प्रशिक विद्यालय, टोला/मांडोखाल रा. बोदरा ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया व गै.अ. खाजगी इसम ज्ञानेष्वर वामन नाकाडे वय-36 वर्ष व्यवसाय- शेती, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रा. कोरंभीटोला ता. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया यांनी माझेकडे माझे सातव्या वेतन आयोगाचा थकबाकीचे उर्वरीत 3 हप्ते काढुन देण्याकरीता रु.15,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन गै.अ.प्रभारी मुख्याध्यापक यांनी ती लाच रक्कम गै.अ.ज्ञानेश्वर नाकाडे यांचेकडे देण्यास सांगुन लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने तसेच गै.अ. श्री अषोक लंजे यांनी लाच मागण्यास प्रोत्साहन दिल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस माझी फिर्याद आहे.

(मुलचंद अर्जुन लोणारे )

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** kamlesh vilas sontakke (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** kamlesh vilas sontakke

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 1983

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल या/पाहिलेल या) शारीरिक वैशिष टये, व यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1968 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1970 | | - | | चेचक: क्र. |
| 3 | पुरुष | 1988 | | - | | चेचक: क्र. |

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**